ePaper

## बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवलं जात आहे; पंतप्रधान मोदी



वर्ष - 9 वे | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 15 मार्च 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 2 वरुन...

एलपीजीला स्वदेशी पर्याय ‘डीएमई’...

### भारतासाठी होर्मुज स्ट्रेटचा मार्ग खुला; इराणचे राजदूत मोहम्मद फतहली यांची घोषणा

# इराणने भारताची मैत्री जपली!


**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेमध्ये भीषण युद्ध सुरू आहे. मात्र युद्ध सुरू असताना देखील इराण भारताच्या मदतीला धावून आलं आहे. इराणकडून मोठी घोषणा करण्यात आली आहे, त्यामुळे भारताचं मोठं टेन्शन दूर झालं आहे. गेल्या 15 दिवसांपासून इराण, अमेरिका आणि इस्त्रायलमध्ये युद्ध सुरू आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणकडून होर्मुज स्ट्रेट बंद करण्यात आला आहे.**





होर्मुज स्ट्रेटमधून कोणत्याही जहाजानं जाण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यावर मिसाईल हल्ले करू असा थेट इशाराच इराणकडून देण्यात आला आहे. इराणने होर्मुज स्ट्रेट बंद करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आम्ही या मार्गावर सुरक्षा पुरवू अशी घोषणा अमेरिकेनं केली होती, मात्र या मार्गावरील जहाजांना सुरक्षा पुरवण्यास अमेरिकनं सैन्यांनी असमर्थता दर्शवली आहे. त्यामुळे अनेक जहाजं गेल्या काही दिवसांपासून या मार्गावर अडकून पडली आहेत. जगभरात मोठ्या प्रमाणात इंधनाचा तुटवडा निर्माण झाला आहे. एकीकडे जगातील अनेक देश होर्मुज स्ट्रेट बंद असल्यामुळे इंधन तुटवड्याचा सामना करत आहेत, तर दुसरीकडे भारतासाठी इराणमधून मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. इराणने भारतासाठी होर्मुज स्ट्रेटचा मार्ग खुला केला आहे.




इराणचे भारतामधील राजदूत मोहम्मद फतहली यांनी भारत आणि इराण संबंधांवर बोलताना मोठं विधान केलं आहे. दोन्ही देशांचे हितसंबंध एकसमान आहेत. इराण आणि भारताचं भविष्य देखील बऱ्याच अंशी परस्परांशी जोडलं गेलं आहे. त्यामुळे अशा परिस्थितीमध्ये दोन्ही देशांनी एकमेकांच्या हिताचा विचार केला पाहिजे. कोणताही तिसरा देश भारत आणि इराण संबंधांमध्ये हस्तक्षेप करणार नाही, तसेच परिस्थितीचा गैरफायदा घेणार नाही याकडे देखील दोन्ही देशांनी लक्ष दिलं पाहिजे, असं मोहम्मद फतहली यांनी म्हटलं आहे. भारत आणि इराणमध्ये जर एखाद्या कारणामुळे कधी दरार निर्माण झाली तर त्याचा फायदा इतर देश घेऊ शकतात. त्यामुळे याकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे, त्यामुळे जर काही मतभेद निर्माण झाले असतील तर ते आपल्या पातळीवरच सोडवले जावेत असंही यावेळी फतहली यांनी म्हटलं आहे.

दरम्यान युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुज स्ट्रेट बंद केला आहे. या होर्मुज स्ट्रेटमधून एकही जहाज जाऊ देणार नाही, असा इशारा इराने दिला आहे. मात्र इराणकडून भारतीय जहाजांना या मार्गाने जाण्याची परवानगी देण्यात आली आहे. या वृत्ताला मोहम्मद फतहली यांनी देखील दुजोरा दिला आहे. इराणने भारतीय जहाजांना या मार्गाने जाण्याची परवानगी दिली आहे, मात्र किती जाहाजांना या मार्गाने जाण्याची परवानगी दिली आहे, हे सांगणं योग्य होणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.



# एलपीजीला स्वदेशी पर्याय ‘डीएमई’

## प्रयोगशाळेने विकसित केले तंत्रज्ञान; पिरंगुटजवळ २५० किलो प्रतिदिन क्षमतेचा उत्पादन प्रकल्प

**महाईन्यूज । पुणे**

**आखातातील युद्धामुळे देशात एलपीजीचा तुटवडा निर्माण झालेला असताना एलपीजीला पर्याय ठरू शकणारे ‘डायमिथिल इथर’ (डीएमई) हे इंधन संपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानातून तयार करण्याची कामगिरी पुण्यातील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेने (एनसीएल) केली आहे. ‘डीएमई’च्या रासायनिक प्रक्रियेसाठी आवश्यक संप्रेरक (कॅटलिस्ट) ‘एनसीएल’ने विकसित केला आहे.**



‘डीएमई’च्या रासायनिक प्रक्रियेसाठी आवश्यक संप्रेरक (कॅटलिस्ट) ‘एनसीएल’ने विकसित केला आहे. ‘डीएमई’चा इंधन म्हणून स्वतंत्रपणे, तसेच ‘एलपीजी’मध्ये मिश्रण करून वापर शक्य असून, ‘डीएमई’च्या प्रायोगिक तत्त्वावरील व्यावसायिक उत्पादनासाठी पिरंगुटनजीक प्रतिदिन २५० किलो क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात येत आहे.

‘एनसीएल’चे संचालक डॉ. आशिष लेले यांनी याबाबतची माहिती दिली. शास्त्रज्ञ डॉ. थिरुमलाईस्वामी राजा, उद्योग भागीदार राजेश दाते, टेक्सॉल इंजिनीअरिंगचे व्यवस्थापकीय संचालक विजयकुमार या वेळी उपस्थित होते. भारतात एलपीजी मोठ्या प्रमाणात आयात करावा लागतो. २०२४ मध्ये भारताने २.१ कोटी टन एलपीजी आयात केला. जगभरात ‘डीएमई’चा वापर केला जातो. आता देशात स्वदेशी तंत्रज्ञानातून ‘डीएमई’चे उत्पादन करणे शक्य झाले आहे.

डॉ. लेले म्हणाले, ‘डॉ. राजा यांच्या नेतृत्वाखाली ‘डीएमई’च्या संशोधनाला २००४मध्ये सुरुवात झाली होती. आता २०२६मध्ये सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन उत्पादन होण्याच्या स्थितीपर्यंत आले आहे. या दरम्यान ६ एकस्व अधिकार (पेटंट) नोंदवण्यात आले. ‘बायोमास’पासून (जैवइंधन) मिथेनॉल तयार करून त्यावर पुढे रासायनिक प्रक्रियेतून ‘डीएमई’ मिळते. या रासायनिक प्रक्रियेसाठीचा विशेष घट ‘एनसीएल’मध्ये विकसित करण्यात आला. त्यानंतर ‘एनसीएल’मध्ये १२ किलोग्रॅम प्रतिदिन उत्पादन प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आले. आता हे तंत्रज्ञान उद्योगाला हस्तांतरित करून व्यावसायिक पद्धतीने उत्पादन शक्य होणार आहे. त्याची सुरुवात २५० टनांच्या प्रकल्पापासून होत आहे. डीएमई हे एलपीजीला पूर्णपणे पर्याय ठरू शकते. डीएमई एलपीजीच्या तुलनेत दीडपट अधिक कार्यक्षम आहे.’

पिरंगुटजवळ उरवडे येथे ‘डीएमई’चा २५० किलो प्रतिदिन क्षमतेचा उत्पादन प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रकल्पाबाबत दाते म्हणाले, ‘एनसीएलने विकसित केलेले तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे. हे इंधन पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या किफायतशीर आहे. १०० किलो बायोमासपासून २५० किलो डीएमई तयार होते. २५० टनांच्या प्रकल्पासाठी १५ एकर जागा आवश्यक आहे. त्यातून ७५ ते १०० प्रत्यक्ष रोजगार, तसेच अनेक अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

स्वयंपाकापासून इंधनापर्यंत पूर्णपणे ‘डीएमई’ वापरण्यासाठीची शेगडी तयार करण्यात आली आहे. त्याच्या चाचण्याही पूर्ण झाल्या आहेत. ‘डीएमई’ ‘एलपीजी’प्रमाणेच सिलिंडरमध्ये साठवता येत असल्याने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक वापर करता येतो. त्यामुळे स्वयंपाकापासून मोटारीपर्यंत ‘डीएमई’चा वापर शक्य आहे. मोटारीत इंधन म्हणून वापरण्यासाठीच्या चाचण्या करण्यात आल्या आहेत. ‘बीआयएस’च्या मानकांनुसार ‘एलपीजी’मध्ये २० टक्के ‘डीएमई’चे मिश्रण करता येऊ शकते. ‘एलपीजी’मध्ये आठ टक्क्यांपर्यंत ‘डीएमई’ मिसळल्यास सिलिंडर, गॅस्केट, रेग्युलेटर, बर्नर बदलण्याची गरज नाही,’ असे डॉ. थिरुमलाईस्वामी राजा यांनी नमूद केले.

“एलपीजी’ आयात करावा लागत असल्याने देशाचा मोठ्या प्रमाणात खर्च होतो. ‘एलपीजी’मध्ये केवळ आठ टक्के ‘डीएमई’ मिसळल्यास ९५०० कोटी रुपयांची बचत होऊ शकते. त्यामुळे ‘डीएमई’च्या माध्यमातून देशाची ऊर्जासुरक्षा साध्य करणे शक्य आहे,’ असे डॉ. आशिष लेले म्हणाले.

### ‘डीएमई’चे उद्दिष्ट

देशाच्या वेगवेगळ्या भागांत ‘डीएमई’ उत्पादन प्रकल्प उभारणे शक्य आहे. येत्या काळात प्रतिदिन २५०० टन क्षमतेचा प्रकल्प उभारण्यासाठी तेल कंपन्यांशी चर्चा सुरू आहे. आता ‘बायोमास’पासून ‘डीएमई’ची निर्मिती करण्यात आली आहे. मात्र, स्वच्छ कार्बन डाय ऑक्साइडपासून मिथेनॉल आणि मिथेनॉलपासून डीएमई तयार करण्याचेही उद्दिष्ट आहे, असे डॉ. आशिष लेले यांनी सांगितले.

---

# गुढीपाडव्यापासून विविध कार्यक्रमांनी सजणार ‘दगडूशेठ’चा संगीत महोत्सव

**महाईन्यूज । पुणे**

**श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे गणपती मंदिराच्या ४२ व्या वर्धापनदिनानिमित्त गुढीपाडव्यापासून म्हणजेच दि. १९ ते २३ मार्च पर्यंत संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा संगीत महोत्सव दररोज सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे.**



संगीत महोत्सवात दिग्गज कलाकारांसह युवा कलाकारांचे सादरीकरण अनुभवण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनिल रासने यांनी दिली.

गुढीपाडव्याला म्हणजेच १९ मार्च रोजी सायंकाळी ४.४५ वाजता गणेशपूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ होणार आहे. तसेच सायंकाळी ६.४५ वाजता महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन होईल. संगीत महोत्सव दोन सत्रांमध्ये होणार आहे. गुरुवारी (दि.१९) पहिल्या सत्रात सायंकाळी ५ वाजता पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा आणि तारपा पथकाचा तारपा वादन व नृत्याचा कार्यक्रम होईल. तर, दुस-या सत्रात सायंकाळी ७ वाजता ज्येष्ठ संगीतकार व गायक श्रीधर फडके व सहका-यांचा फिटे अंधाराचे जाळे हा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, दि.२० मार्च रोजी पं.उपेंद्र भट आणि सहका-यांचा गुरु गणेश हा सांगीतिक कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर नंदेश उमप आणि ७५ कलाकारांचे सादरीकरण असलेला मी मराठी हा कार्यक्रम अनुभवण्याची पर्वणी रसिकांना मिळणार आहे.

शनिवार, दि. २१ मार्च रोजी खंडेराव मुळे आणि सहका-यांचा स्वरायात्रा हा कार्यक्रम सादर होईल. तर, दुस-या सत्रात कुणाला गांजावाला लाईव्ह इन कॉन्सर्ट चा आनंद पुणेकरांना घेता येईल. रविवार, दि. २२ मार्च रोजी नटरंग अ‍ॅकॅडमी तर्फे त्रिपुंड हा कार्यक्रम सादर होणार आहे. त्यानंतर माणिक वर्मा फाऊंडेशन निर्मित अमृताहुनी गोड या कार्यक्रमात राणी वर्मा, वंदना गुप्ते, भारती आचरेकर, शैला दातार, सावनी दातार, निलाक्षी पेंढारकर, दीपिका जोग, ह्रदया दातार यांच्या सादरीकरण पुणेकरांना अनुभवायला मिळणार आहे.

महोत्सवाची सांगता सोमवार, दि. २३ मार्च रोजी पहिल्या सत्रात स्वरप्रज्ञा पं. मिलिंद रायकर, यज्ञेश रायकर यांच्या व्हायोलिन जुगलबंदीने आणि दुस-या सत्रात पं. ह्रदयनाथ मंगेशकर यांचा भावसरगम या स्वरमैफलीने होणार आहे. रसिकांसाठी वाहने पार्किंगची व्यवस्था अप्पा बळवंत चौकातील प्रभात थिएटर समोरील नू.म.वि. मराठी शाळा येथे करण्यात आली आहे. संगीत महोत्सव सर्वांसाठी विनामूल्य खुला असून पुणेकरांनी मोठया संख्येने महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# लिफ्टच्या दरवाजात चिमुकलीचा हात अडकला

## चिमुकलीला वाचवण्यासाठी नागरिकांची धावपळ; काही मिनिटांत संकट टळले

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**लिफ्टचा वापर करताना लहान मुलांकडे दुर्लक्ष करणे किती धोकादायक ठरू शकते, याचा प्रत्यय पिंपरी-चिंचवडमधील दिघी परिसरात नुकताच आला आहे. एका गृहनिर्माण सोसायटीमध्ये घडलेल्या घटनेत लिफ्टच्या दरवाजाच्या सापटीत काही महिन्यांच्या चिमुकलीचा हात अडकण्याचा प्रकार घडला.**






सुदैवाने, त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे आणि तत्परतेमुळे काही मिनिटांतच तिचा हात सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले आणि मोठा अनर्थ टळला. या संपूर्ण घटनेचा थरारक प्रकार सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून तो व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

दिघी परिसरातील एका गृहनिर्माण सोसायटीमध्ये ही घटना घडली. एक महिला आपल्या काही महिन्यांच्या चिमुकलीसह लिफ्टने वरच्या मजल्यावर जात होती. लिफ्ट इच्छित मजल्यावर पोहोचून थांबल्यानंतर दरवाजा उघडला आणि काही क्षणांतच तो पुन्हा बंद होऊ लागला. त्याच वेळी चिमुकलीने सहजपणे आपला हात दरवाजावर ठेवला होता. दरवाजा बंद होत असताना तिचा हात दरवाज्याच्या सापटीत अडकला. हा प्रकार लक्षात येताच लिफ्टमध्ये उपस्थित असलेल्या महिलेसह इतर नागरिकांमध्ये एकच घबराट उडाली. चिमुकली वेदनेने रडू लागल्याने तिला वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करण्यात आले.

नागरिकांनी शांतपणे आणि तत्परतेने प्रयत्न केल्यानंतर काही मिनिटांतच चिमुकलीचा हात सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश आले आणि संभाव्य मोठा अपघात टळला. दरम्यान, या घटनेचा संपूर्ण प्रकार सोसायटीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला असून तो व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर होत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर लिफ्टचा वापर करताना विशेषतः लहान मुलांकडे सतत लक्ष ठेवणे, त्यांना लिफ्टच्या दरवाजांपासून दूर ठेवणे आणि अधिक काळजी घेणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# मोशी येथील आदिवासी शासकीय वसतिगृहातील धक्कादायक प्रकार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**मोशी येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहात दूषित पाणी पिल्यामुळे २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून पालकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.**




मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, वसतिगृहात पुरविण्यात येणारे दूषित पाणी पिल्यानंतर काही विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक बिघडू लागली. पाणी पिल्यानंतर विद्यार्थ्यांना उलट्या, जुलाब, मळमळ, पोटदुखी आणि अशक्तपणा जाणवू लागला. काही विद्यार्थ्यांची प्रकृती इतकी खालावली की त्यांना उभे राहणेही कठीण झाले. हा प्रकार लक्षात येताच वसतिगृह प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदत करून सर्व विद्यार्थ्यांना भोसरी येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. रुग्णालयात डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांच्यावर तातडीने प्राथमिक उपचार केले. उपचारानंतर काही विद्यार्थ्यांची प्रकृती सुधारल्याने त्यांना घरी सोडण्यात आले आहे. मात्र अजूनही सुमारे ८ ते १० विद्यार्थ्यांवर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रशासनाच्या निष्काळजी आणि भोंगळ कारभारावर गंभीर आरोप केले आहेत. शासनाकडून वसतिगृहासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येत असतानाही विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. वसतिगृहात बसविण्यात आलेले वॉटर फिल्टर अनेक दिवसांपासून नादुरुस्त अवस्थेत असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. या संदर्भात विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. मात्र त्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि फिल्टरची दुरुस्ती करण्यात आली नाही, असे विद्यार्थ्यांनी सांगितले. त्यामुळे सुरक्षित पिण्याच्या पाण्याअभावी विद्यार्थ्यांना बाहेरून पाणी आणून पिण्याची वेळ आली होती. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी विद्यार्थ्यांनी यासंदर्भातील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करत स्वच्छ व सुरक्षित पिण्याच्या पाण्याची मागणी केली होती. इतकी गंभीर घटना घडूनही आदिवासी प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई यांनी अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या प्रकारामुळे पालकांमध्येही संतापाची भावना निर्माण झाली असून त्यांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आपल्या मुलांच्या आरोग्याशी आणि जीवाशी खेळ करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पालकांनी केली आहे. दरम्यान, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते अनिल तिटकारे यांनी या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर आणि तातडीची कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

तसेच वसतिगृहांमधील पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, स्वच्छता आणि आरोग्यविषयक उपाययोजना तातडीने सुधारण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

# इराण-भारत मैत्रीचा इतिहास



## भूमिका

**अमेरिका, इस्रायल विरुद्ध इराण यांच्यातील युद्ध दिवसेंदिवस चिघळत चाललेले दिसते. त्यामुळे तेल वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या होर्मुझ सामुद्रधुनीतील जल वाहतूक ठप्प झाली आहे. परिणामी पेट्रोल, डिझेल आणि गॅसची पुरती नाकाबंदी झाल्याचे चित्र आहे.**

खरे तर इराण आणि भारताचे मैत्र जुने आहे. इराण हा देश कधीच भारतविरोधी म्हणून गणला गेला नाही. अगदी शतकानुशतकापासून दोन देशांमध्ये सांस्कृतिक, आर्थिक आणि राजनैतिक संबंध आहेत. प्राचीन पर्शियन साम्राज्य आणि भारतीय उपखंड यांच्यामध्ये व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाण होत असे. पारसी भाषा अनेक शतकांपर्यंत भारतातील दरबारी भाषा असल्याचे सांगितले जाते.



स्वातंत्र्यानंतर दोन्ही देशांनी राजनैतिक संबंध अधिक दृढ केले. ऊर्जा क्षेत्र, बंदरे, व्यापार आणि मध्य आशियाशी संपर्क यामध्ये सहकार्य वाढले. इराण हा कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा महत्त्वाचा पुरवठादार देश. कोणत्याही व्यापारामध्ये व्यवहार महत्त्वाचा असतो. पण, इराणने व्यवहाराइतकेच आपापसांतील संबंधांना आणि मैत्रीला महत्त्व दिल्याचे इतिहास सांगतो. अडचणीच्या काळात इराणने भारताला उधारीवर तेल दिले, तेही बिनव्याजी स्वरुपात, हे येथे लक्षात घेतले पाहिजे. काश्मीरच्या मुद्द्यावरही इराणने नेहमीच भारताची पाठराखण केली. अनेक मुस्लिम देश पाकिस्तानकडे झुकलेले असताना इराण भारताच्या बाजूने उभा राहिल्याचे आपण पाहिले. 1994 मध्ये संयुक्त राष्ट्रात पाकिस्तानने आणलेला ठराव इराणने रोखला. काश्मीर हा भारताचा अंतर्गत प्रश्न आहे. तो द्विपक्षीय चर्चेतून सुटावा, अशी स्पष्ट भूमिका इराणने तेव्हा घेतल्याचे दिसून येते. भारतानेही इराणसोबत अनेक मोठे प्रकल्प हाती घेतले.

त्यामध्ये चाबहार या बंदराच्या विकासाचा प्रकल्प विशेष महत्त्वाचा. या प्रकल्पामुळे भारताला पाकिस्तानला वळसा घालून अफगाणिस्तान आणि मध्य आशियाशी थेट व्यापार करता येतो. इराण-पाकिस्तान-भारत हा गॅस पाइपलाईन प्रकल्प प्रत्यक्षात आला नसेलही. परंतु, हा प्रकल्पही दोन देशांतील मैत्रीच अधोरेखित करतो. इराणमधील प्रचंड नैसर्गिक वायू साठ्याचा उपयोग करण्यासाठी 2000 च्या दशकात इराण-पाकिस्तान-भारत गॅस पाइपलाईनची संकल्पना मांडण्यात आली.

या प्रकल्पास 'पीस पाइपलाईन' म्हणूनही संबोधले गेले. त्यानुसार ही गॅस पाइपलाईन इराणमधील साऊथ पार्स गॅस क्षेत्रातून सुरू होऊन पाकिस्तानमधून भारतात येणार होती. भारताला स्वस्त नैसर्गिक वायू मिळेल आणि ऊर्जा सुरक्षेला मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा होती. त्या काळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या सरकारने या प्रकल्पाबाबत गंभीर चर्चा केल्याचे दिसून आले. परंतु, नंतरच्या काळात हा प्रकल्प बारगळला. इराणच्या अणुकार्यक्रमामुळे अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांनी इराणवर कठोर आर्थिक निर्बंध लादले. अशा परिस्थितीत इराणसोबत मोठा ऊर्जा प्रकल्प राबवल्यास भारतावरही निर्बंध येऊ शकतात, अशी भीती होती. मुळात अमेरिकेने या प्रकल्पाला तीव्र विरोध केला होता. त्यामुळे भारताने माघार घेतली आणि एका चांगल्या प्रकल्पाला ब्रेक बसला. हा पाइपलाईन प्रकल्प पाकिस्तानमधून जाणार होता. भारत आणि पाकिस्तानमधील तणावपूर्ण संबंध लक्षात घेता पाइपलाईनची सुरक्षा हादेखील मोठा प्रश्न होता. संघर्ष झाल्यास पुरवठा बंद होण्याची शक्यता होती. त्यामुळे दोन देशांतील तणावाचा या प्रकल्पाला फटका बसला.

गॅसच्या किंमतीबाबत इराण आणि भारत यांच्यामध्ये काहीसे मतभेद असल्याचेही सांगितले जाते. भारताला स्वस्त दरात गॅस हवा होता, तर इराण अधिक दराची मागणी करत होता. असे असले, तरी हे मतभेद मिटू शकले असते. परंतु, यापेक्षा अमेरिका आणि पाकिस्तान या मोठ्या अडचणी होत्या.

## प्रासंगिक »

### दुर्बळावर अन्याय

***एकदा जंगलात भयंकर रोगाची साथ पसरली आणि अनेक प्राणी मरू लागले. देवाचा कोप झाला असावा असे सर्वांना वाटले.***

त्यामुळे सर्व प्राण्यांनी आपापले पाप कबूल करायचे आणि सर्वात मोठा अपराधी देवाला शांत करण्यासाठी बळी द्यायचा असा निर्णय घेतला. न्यायाधीश म्हणून कोल्ह्याची निवड झाली. सिंह पुढे येऊन म्हणाला, "मी अनेक कोकरं आणि एक धनगरही मारून खाल्ला." कोल्हा म्हणाला, "महाराजांना अशा गोष्टी चालतात." वाघ, चित्ता आणि अस्वल यांनीही मोठे अपराध कबूल केले, पण कोल्ह्याने त्यांना माफ केले. शेवटी एक गाढव पुढे येऊन म्हणाले, "मी एका शेतकऱ्याच्या शेतातील मूठभर गवत खाल्ले." ते ऐकताच कोल्हा ओरडला, "याच्यामुळेच देवाचा कोप झाला आहे." मग सर्व प्राण्यांनी मिळून त्या बिचाऱ्या गाढवाला ठार मारले.

तात्पर्य- जगात अनेकदा बलवानांचे मोठे अपराध दुर्लक्षित होतात, तर दुर्बळांच्या छोट्या चुका देखील मोठा गुन्हा ठरवून त्यांच्यावर अन्याय केला जातो.

बॅलिस्टिक क्षेपणास्त्र, क्रूझ क्षेपणास्त्र, रॉकेट्स, तोफखाना तसेच हायपरसॉनिक बूस्ट-ग्लाईड डिलिव्हरी प्रणाली या आधुनिक 21 व्या शतकातील गुंतागुंतीच्या हल्ला प्रणालींचा भाग बनल्या आहेत. अमेरिका, इस्रायल, लेबनॉन, युक्रेन आणि रशिया यांसारख्या देशांना अलीकडील संघर्षांमध्ये या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर सामना करावा लागत आहे.

# आधुनिक युद्धातील प्रभावी अस्त्र; क्षेपणास्त्र

आधुनिक युद्धामध्ये क्षेपणास्त्र तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रारंभी रॉकेटद्वारे प्रक्षेपित केले जातात. त्यानंतर ती गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाखाली मुक्त मार्गाने आपल्या लक्ष्याकडे प्रवास करतात. या क्षेपणास्त्रांची श्रेणी त्यांच्या इंजिनांच्या शक्तीवर आणि पेलोडच्या वजनावर अवलंबून असते. अधिक अंतर गाठण्यासाठी रॉकेटचे अनेक टप्पे एकमेकांच्या वर बसवले जातात; या प्रक्रियेला 'स्टेजिंग' असे म्हणतात. बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची लहान, मध्यम आणि आंतरखंडीय अशा प्रकारे विभागणी केली जाते. लहान व मध्यम श्रेणीतील क्षेपणास्त्रांना 'थिएटर बॅलिस्टिक मिसाइल' म्हणतात, तर लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना 'स्ट्रॅटेजिक बॅलिस्टिक मिसाइल' असे संबोधले जाते.

क्रूझ क्षेपणास्त्र तुलनेने कमी उंचीवर उड्डाण करतात आणि रडारपासून बचाव करण्यासाठी निश्चित मार्गाने प्रवास करतात. अचूक लक्ष्य भेदण्यासाठी




त्यांचा वापर केला जातो. क्षेपणास्त्रांचे वर्गीकरण त्यांच्या इंधनाच्या प्रकारावरही केले जाते. घन इंधन असलेल्या क्षेपणास्त्रांना कमी देखभाल आणि कमी तयारीची गरज असते, कारण त्यामध्ये इंधन आणि ऑक्सिडायझर एकत्र असतात. तर द्रव इंधन असलेल्या क्षेपणास्त्रांमध्ये हे दोन्ही घटक वेगळे ठेवावे लागतात.

क्षेपणास्त्र प्रणाली ही अत्यंत प्रगत शस्त्र प्रणाली आहे. यात प्रोपल्शन, मार्गदर्शन आणि नियंत्रण यांसारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश असतो. प्रोपल्शन प्रणाली क्षेपणास्त्राला पुढे जाण्यासाठी शक्ती पुरवते. मार्गदर्शन प्रणाली जीपीएस, रडार, लेसर किंवा जडत्वीय नेव्हिगेशनच्या साहाय्याने क्षेपणास्त्राला लक्ष्याकडे नेते. नियंत्रण प्रणाली उड्डाणादरम्यान स्थिरता राखते आणि आवश्यकतेनुसार मार्ग बदलते. याशिवाय वॉरहेड म्हणजेच स्फोटक भार हा क्षेपणास्त्राचा महत्त्वाचा भाग असतो.

आधुनिक काळात क्षेपणास्त्र तंत्रज्ञानात मोठी प्रगती झाली आहे. हायपरसॉनिक क्षेपणास्त्र ही त्यातील एक महत्त्वाची नवकल्पना आहे. ही क्षेपणास्त्र ध्वनीच्या गतीपेक्षा पाचपट किंवा त्याहून अधिक वेगाने प्रवास करतात. त्यांच्या प्रचंड वेग आणि चपळतेमुळे विद्यमान संरक्षण प्रणालींना त्यांना अडवणे कठीण होते. तसेच स्टेल्थ तंत्रज्ञानामुळे क्षेपणास्त्रांचा रडार सिग्नेचर कमी होतो, त्यामुळे ती शोधणे अवघड होते.

आज क्षेपणास्त्र प्रणाली राष्ट्रीय सुरक्षेचा महत्त्वाचा भाग बनल्या आहेत. हायपरसॉनिक वेग, अचूक मार्गदर्शन आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्रणाली यामुळे या तंत्रज्ञानाची क्षमता सतत वाढत आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती ।
रखुमाईच्या पती सोयरिया ॥१॥

गोड तुझें रूप गोड तुझें नाम ।
देईं मज प्रेम सर्व काळ ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रत्येक वर्षी वीजदर कमी होणार; मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांकडून गुडन्यूज! राज्यातील नागरिकांना मोठा दिलासा

महाईन्यूज । मुंबई

**'पूर्वी वीजेचे दर प्रत्येक वर्षी ९ टक्क्यांनी वाढायचे. मात्र, २०२५ ते २०३० या पाच वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी वीजेचे दर १.२ टक्क्यांनी कमी होणार आहेत. घरगुती वीजेसाठी आज जो दर आहे तो २०३० मध्ये २६ टक्क्यांनी तर औद्योगिक उपयोगासाठी लागणाऱ्या वीजेचा दर ९ टक्क्यांनी कमी झालेला असेल,' अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.**



वारी एनर्जीजच्या अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील सोलर इनगॉट आणि वेफर उत्पादन प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर वारी एनर्जीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. हितेश दोशी, राज्यमंत्री ॲड. आशिष जैस्वाल, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, वारी एनर्जीजचे संचालक किरीट दोशी, संचालक पंकज दोशी, माजी खासदार अजय संचेती, वीरेन दोशी यांची उपस्थिती होती. अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रातील प्रगतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. "आज भारत सर्वात वेगाने पारंपरिक ऊर्जेकडून अपारंपरिक ऊर्जेकडे वळणारा देश ठरत आहे. पूर्वी आपण चीनमधून सोलर मोड्युल, वेफर, इनगॉट आयात करायचो. आता तसे राहीलेले नाही. मुख्यमंत्री सौरवाहिनी प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांची १६ हजार मेगावॅट विजेची गरज पूर्ण करण्याचे काम वेगाने सुरू आहे. आतापर्यंत ५ हजार मेगावॅट क्षमता निर्माण झाली असून, वर्षाखेरपर्यंत हा आकडा १४ हजार मेगावॅटवर पोहोचेल", अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. थर्मल पॉवरद्वारे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी ३०० कोटी झाडे लावावी लागली असती. मात्र, सौरऊर्जेमुळे एकही झाड न लावता हे प्रदूषण रोखणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, सौर कृषीपंप योजनेअंतर्गत देशातील एकूण पंपांपैकी ६० टक्के पंप एकट्या महाराष्ट्रात बसवण्यात आले असून, एका महिन्यात सर्वाधिक पंप लावण्याचा जागतिक विक्रम (गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड) महाराष्ट्राने नोंदवला आहे, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. लोकं दावोसवर टीका करत असतात. मी त्या टीकेला कामाने उत्तर देत असतो. आज मी तीन प्रकल्पांचे भूमिपूजन केले आहे.

### 'अठरा महिन्यात प्रकल्प कार्यान्वित करू'

"२००७ मध्ये जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हा आम्ही त्यांच्या प्रोत्साहनाने सोलर क्षेत्रात उतरलो. आज सोलर क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी म्हणून आम्ही उदयास आलो आहे. याच श्रृंखलेत नागपूर येथे उद्योग सुरू करण्याचा मानस होता. त्यानुसार, येथे हा प्रकल्प सुरू होत आहे. यामध्ये महाराष्ट्र सरकारचे संपूर्ण सहकार्य लाभले. तीन दिवसांत जागा मिळाली. पंधरा दिवसांत बांधकाम सुरू करून अठरा महिन्यांत हा प्रकल्प कार्यान्वित करू. यासाठी ३० हजार कोटींची गुंतवणूक आम्ही करणार आहोत. २ हजार लोकांना प्रत्यक्ष तर चार ते सहा हजार लोकांना अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. या प्रकल्पांतर्गत सोलर क्षेत्रातील संशोधन केंद्र, कौशल्य विकास केंद्र येथे होईल. पाचशे जणांना चीन येथे पाठवून त्यांना प्रशिक्षण देण्यात येईल", अशी माहिती प्रास्ताविकपर भाषणात वारी एनर्जीजचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. हितेश दोशी यांनी दिली.

# गॅस टंचाईमुळे शिर्डीत साईभक्तांच्या प्रसाद भोजनात कपात

महाईन्यूज । शिर्डी

**एलपीजी गॅस टंचाईची झळ आता शिर्डीतील साईभक्तांना जाणवू लागली आहे. गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर साईबाबा संस्थानने प्रसादालयातील प्रसाद भोजन व्यवस्थेत आणि लाडू प्रसादात तात्पुरता बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. वरण-भातऐवजी मसाले भात, एक रसा भाजी आणि चपाती तसेच गूळ शिरा भाविकांना प्रसाद म्हणून तर एका भाविकाला एकच लाडू पाकीट देण्यास आज, शनिवारपासून सुरुवात करण्यात आली आहे.**



भाविकांना प्रसाद सेवा अखंडितपणे देता यावी आणि उपलब्ध गॅसचा साठा अधिक काळ टिकवता यावा यासाठी साईबाबा संस्थानने हा निर्णय घेतला आहे. सध्या शिर्डी साईबाबा संस्थानकडे १० ते १२ दिवस पुरेल इतकाच एलपीजी गॅसचा साठा उपलब्ध असल्याची माहिती संस्थानच्या वतीने देण्यात आली. पुढील काही दिवसांत गॅस पुरवठ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन साईबाबा प्रसादालयातील स्वयंपाक पद्धतीत साधेपणा आणण्याचा निर्णय साई संस्थानने घेतला आहे.

एरवी साईबाबा प्रसादालयात भाविकांना प्रसाद म्हणून दोन भाज्या, चपाती, वरण-भात आणि गोड पदार्थ दिला जातो. मात्र आता गॅस टंचाईच्या समस्येला सामोरे जाण्यासाठी संस्थानने प्रसादाच्या पदार्थामध्ये बदल केला आहे. वरण-भातऐवजी मसाले भात, एक रस्सा भाजी आणि चपाती तसेच गूळ शिरा भाविकांना प्रसाद म्हणून आजपासून देण्यास सुरुवात करण्यात आली.

साईबाबा संस्थानकडे सध्या १० ते १२ दिवस पुरेल इतकाच एलपीजी गॅसचा साठा उपलब्ध आहे. यावर आता फक्त एक भाजी आणि चपाती बनवण्याचे काम संस्थानकडून केले जात आहे तसेच साईबाबा संस्थानकडे असलेल्या सौर उर्जेवर भात आणि कडधान्य शिजवले जात आहे. लाडू प्रसाद बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस लागत असल्याने जिथे दररोज ५० हजार लाडू पाकिटे बनवली जात होती तिथे आता २५ ते ३० हजार लाडू पाकिटे बनवली जात आहेत. प्रत्येक भाविकाला साईबाबांचा लाडू प्रसाद मिळावा यासाठी शनिवारपासून एका भाविकाला एकच लाडू पाकीट दिले जात आहे. भाविकांची सेवा खंडित होऊ नये आणि प्रसाद वितरणाची परंपरा अखंड सुरू राहावी हा संस्थानचा मुख्य उद्देश आहे, असे साई संस्थानने स्पष्ट केले. गॅसपुरवठा पूर्ववत झाल्यानंतर लाडू प्रसाद आणि प्रसादालयातील पूर्वीची व्यवस्था पुन्हा सुरू केली जाईल असेही संस्थानच्या वतीने सांगण्यात आले. परिस्थितीची जाणीव ठेवून भाविकांनीही या निर्णयाला सकारात्मक प्रतिसाद दिला असून लाडू प्रसाद आणि मुख्य प्रसादालाही साईसेवेचा भाव मानत भाविकांकडून स्वीकार होत आहे.

# भारताने आम्हाला मोठी मदत केली

## पुढील आठवड्यात आणखी मोठ्या हल्ल्याची तयारी; डोनाल्ड ट्रम्प

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**बहुराष्ट्रीय नौदल सराव संपवून परतत असताना ४ मार्च रोजी अमेरिकेने इराणची युद्धनौका 'आयआरआयएस देना' (IRIS DENA) टॉर्पिडो मारून बुडवली होती. या हल्ल्यात १०० हून अधिक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. ही घटना भारताच्या प्रभावक्षेत्रात घडल्याने आणि युद्धनौका विशाखापट्टणम येथून परतत असताना लक्ष्य करण्यात आल्याने भारतात मोठा वाद निर्माण झाला होता. मात्र, भारतामधील इराणी राजदूत मोहम्मद फताली यांच्या वक्तव्याने आता या वादाला पूर्णविराम मिळाला आहे.**



मध्यमांशी बोलताना मोहम्मद फताली म्हणाले, "भारत सरकारने आम्हाला खरोखरच मोठी मदत केली आहे. मी फक्त इराण आणि भारताबद्दल बोलेन. मी भारताचा इराणी राजदूत आहे. तिसऱ्या देशाबद्दल (श्रीलंका) मी भाष्य करणार नाही. एक राजदूत म्हणून मला प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने पाहावे लागते. या जहाजांच्या बाबतीत भारत सरकारने आम्हाला मोलाचे सहकार्य केले. त्यांनी आमची विनंती मान्य केली, पण दुर्दैवाने इतर काही देशांनी सहकार्य करण्यास नकार दिला."

"या सर्वांचा विचार करता, आम्ही निश्चितपणे अमेरिकेला चोख प्रत्युत्तर देऊ. त्यातील काही भाग आम्ही पूर्ण केला आहे. लवकरच तुम्हाला चांगली बातमी ऐकायला मिळेल. इराण कोणतीही कारवाई प्रत्युत्तराशिवाय सोडत नाही," असा इशाराही त्यांनी दिला.

'आयआरआयएस देना' बुडवली गेली असतानाच, भारताने ४ मार्च रोजी इराणच्या दुसऱ्या युद्धनौकेला, 'आयआरआयएस लावन' (IRIS LAVAN) ला कोचीमध्ये आश्रय दिला होता. 'आयआरआयएस लावन'मधील १८३ पैकी ५० कर्मचारी कोचीमध्येच थांबले असून, उर्वरित कर्मचाऱ्यांना भारताने मायदेशी रवाना केले आहे.

श्रीलंकेचे खासदार नामल राजपक्षे 'आयआरआयएस देना' बाबत बोलताना म्हणाले होते की, "या घटनेने आंतरराष्ट्रीय कायदा आणि हिंदी महासागरातील बड्या देशांच्या वर्तनावर मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. याच्या कायदेशीरतेवर तज्ज्ञ चर्चा करू शकतात, परंतु हिंदी महासागरात पाळली जाणारी नैतिक मूल्ये आणि पद्धती नक्कीच पायदळी तुडवल्या गेल्या आहेत."

### वादाचे कारण काय होते?

संरक्षण तज्ज्ञांच्या मते, इराणच्या युद्धनौकेवरील या हल्ल्याने 'इराण युद्ध' भारताच्या दारापर्यंत आणले आहे. ही घटना श्रीलंकेच्या गालेपासून ४० नॉटिकल मैल दक्षिणेला आंतरराष्ट्रीय समुद्रात घडली. टीकाकारांच्या मते, हा हल्ला भारताच्या सागरी अधिकारक्षेत्रात झाला नसला तरी तो भारताच्या प्रभावक्षेत्रात झाला आहे. माजी परराष्ट्र सचिव कन्वल सिबल यांनी 'X' वर पोस्ट केले होते की, "जर आपण त्या जहाजाला सरावासाठी आमंत्रित केले नसते, तर ते तिथे नसते. या हल्ल्याला भारत राजकीय किंवा लष्करीदृष्ट्या जबाबदार नसला तरी, आपली जबाबदारी नैतिक आणि मानवी स्तरावर आहे." दरम्यान, आता इराणच्या राजदूतांनी भारताच्या भूमिकेचे समर्थन केल्यामुळे ५ मार्च रोजी युद्धनौका बुडवल्यापासून सुरू असलेल्या वादावर आता अधिकृतपणे पडदा पडला आहे.

# बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवलं जात आहे; पंतप्रधान मोदी

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्येच ममता सरकारवर थेट निशाणा साधला. कोलकात्यातील 'परिवर्तन संकल्प यात्रा' सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, "बंगालमध्ये हिंदूंना अल्पसंख्यक बनवले जात आहे. आता या 'निर्मम' सरकारचा अंत निश्चित असून बंगालमधून महाजंगलराजचा खात्मा निश्चित आहे."**



तृणमूल काँग्रेसने (TMC) सभेला येणाऱ्या नागरिकांना 'चोर' म्हणून संबोधल्याचा उल्लेख करत मोदी म्हणाले, "खरे चोर कोण आहेत हे बंगालची सुजाण जनता ओळखून आहे. आपली सत्ता जात असल्याचे पाहून येथील सरकार सैरभैर झाले आहे. ते केंद्र सरकारच्या योजनांमध्ये अडथळे आणत आहेत. या योजनांसाठी राज्याला एक पैसाही द्यायचा नाही, तरीही केंद्राच्या योजनांचा लाभ बंगालमधील जनतेला मिळू नये, असे इथल्या सरकारला वाटते." असा आरोप त्यांनी केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज कोलकातामध्ये प्रचार रॅली होणार आहे. मात्र या रॅलीपूर्वीच भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार हाणामारी झाली. हे प्रकरण एवढं वाढलं की दोन्ही गटामध्ये दगडफेक देखील झाली.

तृणमूल काँग्रेसने भाजप कार्यकर्त्यांवर बंगालचे मंत्री डॉक्टर शशी पांजा यांच्या गिरीश पार्क मधील कार्यालयात दगडफेक केल्याचा आरोप केला. या दगडफेकीत तृणमूल काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते जखमी झाले आहेत. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शेवटी प्रशासनाला अतिरिक्त पोलीस बल तैनात करावं लागलं.

दुसरीकडं भाजपनं दावा केला की तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लॅलीमध्ये जाणाऱ्या वाहनांवर दगडफेक केली. या दगडफेकीत अनेक भाजप कार्यकर्ते जखमी झाले. या गोंधळात भाजपचे नॉर्थ कोलकाता जिल्हा अध्यक्ष तमोघ्राय घोष हे देखील जखमी झाले आहेत.

### पंतप्रधान आवास योजनेचा उल्लेख सुद्धा केला

याशिवाय, पंतप्रधान आवास योजनेच्या यशासंदर्भात भाष्य करताना मोदी म्हणाले, देशभरातील गरिबांना पक्की घरे मिळत असताना बंगालमध्ये मात्र या योजनेचे नाव बदलण्यात आले. लाभार्थ्यांच्या यादीत फेरफार करण्यात आले, यामुळे ज्या गरिबांना हक्काचे घर मिळायला हवे होते, ते आजही प्रतीक्षेतच आहेत. केवळ पायाभूत सुविधाच नव्हे, तर आरोग्यासारख्या महत्त्वाच्या योजनांमध्येही टीएमसी राजकारण करत असल्याची टीका त्यांनी केली.

### आयुष्मान भारत योजनेवरून निशाणा


यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात आयुष्मान भारत योजनेचा विशेष उल्लेख केला. ते म्हणाले, टीएमसी सरकार आपल्या स्वार्थी राजकारणामुळे ही योजना राज्यात लागू करत नाही. यामुळे बंगालमधील कुटुंब ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांपासून वंचित राहत आहेत.

# उर्वशी रौतेला मायदेशी परतली



इराण-इस्रायल-अमेरिकेच्या युद्धदजन्य परिस्थितीमुळे सध्या तणावाचे वातावरण आहे. या युद्धाच्या भीषण परिस्थितीत बॉलिवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला कुवैतमध्ये अडकली होती. मात्र आता ती सुखरूपरित्या मायदेशी परतली आहे. युद्धाच्या या भीषण परिस्थितीत कुवैतमधून बाहेर पडल्यानंतर उर्वशीने इन्स्टाग्राम स्टोरीवर पोस्ट शेअर करून चाहत्यांना अपडेट दिली होती. तसेच तिने भावुक पोस्ट शेअर करत लिहिले होते की, “जोपर्यंत मी विमानात बसले नव्हते, तोपर्यंत सर्व काही ठीक होते. पण विमानात बसताच मला अचानक भीती वाटू लागली आणि माझे हृदय वेगाने धडधडू लागले. मला माहित नाही का, पण अचानक मी खूप घाबरले होते.” तिने पुढे लिहिले, “सध्या मला असुरक्षित आणि अस्वस्थ वाटत आहे. मला खरोखरच तुमच्या प्रार्थनांची गरज आहे. कृपया मला तुमच्या विचारात ठेवा, जेणेकरून माझा प्रवास सुरक्षित होईल. हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. जर हे वाचून तुम्हाला चिंता वाटली असेल किंवा मी भावूक वाटत असेल, तर कृपया माफ करा. मी फक्त माझे अनुभव व्यक्त करत आहे. तुमच्या प्रार्थना आणि पाठिंब्याची या वेळी मला खूप गरज आहे.” मिळालेल्या माहितीनुसार, उर्वशी कुवैतमध्ये एका व्यावसायिक कामासाठी गेली होती, त्याच दरम्यान मध्य-पूर्वेतील तणाव वाढला. मात्र, आता उर्वशी सुखरूप मुंबईत परतली आहे. तिने स्वतः कारमध्ये बसून एक व्हिडिओ शेअर करत आपण सुरक्षित असल्याची माहिती दिली आहे. याआधी अभिनेत्री ईशा गुप्ता देखील २८ फेब्रुवारीपासून अबू धाबीमध्ये अडकली होती आणि तीही भारतात परतली आहे. मायदेशी परत येताच तिने भारत आणि यूएई सरकारने केलेल्या मदतीसाठी आभार मानले. दरम्यान, मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावामुळे अनेक देशांनी त्यांच्या नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. या परिस्थितीमुळे त्या भागातील विमानसेवा आणि प्रवास व्यवस्थेवरही काही प्रमाणात परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. अनेक कलाकार आणि व्यावसायिक व्यक्ती त्या भागात कामानिमित्त गेले असल्याने त्यांच्या सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त केली जात होती.

# तनुश्रीने सांगितल DARK TRUTH



मीटू चळवळच्या माध्यमातून बॉलिवूड अभिनेत्री तनुश्री दत्ता हिने अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप केले होते. यानंतर अख्खी चित्रपटसृष्टी हादरून गेली. तेव्हापासून तनुश्री सतत कोणत्या कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. नुकत्याच दिलेल्या एका पॉडकास्टमध्ये तिने केलेल्या खळबळजनक दाव्यांमुळे ती पुन्हा चर्चेत आली आहे. पॉडकास्टमध्ये तिने इंडस्ट्रीमधील नवोदित कलाकारांवरील शोषण, फसवणूक याविषयी अत्यंत गंभीर दावे केले आहेत. अनेक नवोदित कलाकार सुरुवातीला गोड बोलण्याला आणि आश्वासनांना भुलतात. मात्र त्यानंतर ते स्वतःला अत्यंत धोकादायक परिस्थितीत अडकलेलं पाहतात. त्यावेळी वेळ निघून गेलेली असते. फसवणूक, शोषण आणि संधींची खोटी आश्वासनं देऊन त्यांना जाळ्यात ओढले जात असल्याचा मोठा दावा तनुश्रीने केला आहे. यावर ती म्हणाली, “त्यांना सांगितलं जातं, ‘तू खूप देखणा आहेस’ किंवा ‘तू खूप सुंदर आहेस’ आणि नेमक्या याच पद्धतीनं कोणीतरी त्यांना भुलवण्याचं काम करतं. त्यांच्याकडे खरोखरंच प्रतिभा आहे की नाही, हे मात्र कोणालाच ठाऊक नसतं.” पुढे बोलताना अभिनेत्री म्हणाली, “काही लोक तुमचं कौतुक करत तुमच्या जवळ येतील, आणि त्यानंतर दुसरा एक ग्रुप येईल जो तुम्हाला भरकटवून टाकेल. आधी ते तुमचा आत्मविश्वास वाढवतात आणि मग तेच तुम्हाला ऑर्डर द्यायला सुरुवात करतात, असा सावधानगिरीचा इशारा दिला आहे. यासोबतच तनुश्रीने इंडस्ट्रीतील एका काळ्या बाजूबद्दल खळबळजनक दावा केला आहे. “काही लोक वेश्याव्यवसायाकडे वळतात. कारण त्यांनी इतक्या तीव्र शोषणाचा सामना केलेला असतो की, अखेरीस इतर लोकच त्यांना या धंद्यात ढकलतात. काही व्यक्तींची मानसिक स्थिती इतकी बिघडते की, त्या केवळ आपल्या मूळ गावी परत जातात. अशा गोष्टी क्वचितच जगासमोर येतात, कारण ही इंडस्ट्री केवळ यशाच्या स्टोरी प्रसिद्ध करण्याकडे कल ठेवते, असे प्रखड मत तिने मांडले.

# भूमीचा मराठमोळा लुक



मराठमोळी अभिनेत्री भूमी पेडणेकरने ने अनेक बॉलीवूड चित्रपटांमध्ये काम केले आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर तिने चाहत्यांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. सध्या भूमी तिच्या मराठमोळ्या लुकमुळे चर्चेत आली आहे. भूमीने पैठणी साडीत खास फोटोशूट केलं आहे. हे फोटो तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. भूमीने पैठणी साडी नेसत त्यावर गुलाबी डिझायनर ब्लाऊज घातल्याचं दिसतं आहे. पैठणीमध्ये तिचं सौंदर्य खुलून आलं आहे. तिच्या ज्वेलरीने विशेष लक्ष वेधून घेतलं आहे. गळ्यात तिने चोकर आणि एक मोहनमाळ घातली आहे. तर बन बांधत भूमीने खास हेअरस्टाइल केल्याचं दिसत आहे. कपाळावर चंद्रकोर लावत भूमीने तिचा लूक पूर्ण केला आहे. अगदी साध्या मेकअपमध्येही भूमीचं सौंदर्य उठून दिसत आहे. भूमीचा हा मराठमोळा लूक पाहून चाहतेही खूश झाले आहेत. एका इव्हेंटसाठी तिने हा खास लूक केला होता. सध्या तिच्या या लुकने सर्वांचे लक्ष वेधले आहे. तिच्या या फोटोशूटवर चाहत्यांकडून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत आहे.

# कुठे गेली शनाया

'माझ्या नवऱ्याची बायको' ही झी मराठी वाहिनीवरील गाजलेली मालिका. नावामुळेच ही मालिका चर्चेत आली होती. मालिकेत अनिता दाते केळकर, अभिजीत खांडकेकर आणि रसिका सुनील यांच्या मुख्य भूमिका होत्या. अनिताने राधिकाची भूमिका साकारली होती. तर अभिजीत गुरूनाथच्या भूमिकेत होता. 'माझ्या नवऱ्याची बायको'मधली शनाया प्रेक्षकांना खूपच आवडली होती. शनायाच्या भूमिकेत रसिका सुनील होती. या भूमिकेने रसिकाला प्रसिद्धी मिळवून दिली. रसिकाने जवळपास ४ वर्ष मालिकेत काम केलं. नंतर तिने मालिका सोडली होती. २०२१ मध्ये रसिकाने आदित्य बिलागीसोबत लग्न करत संसार थाटला आहे. तिचा नवरा पेशाने सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. 'माझ्या नवऱ्याची बायको'नंतर रसिका काही सिनेमांमध्ये दिसली. गर्लफ्रेंड, बघतोस काय मुजरा कर, उर्मी, बस स्टॉप, फकाट, तुला कळणार नाही या चित्रपटांत तिने काम केलं आहे. रसिका सध्या दोन वाजून बावीस मिनिटांनी या नाटकातून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. रसिका सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. अनेक अपडेट्स ती चाहत्यांना देत असते.



# रोहित-विराटचं नावही नाही!

## यंदा कोणकोणते खेळाडू ठरले BCCI अवॉर्ड्सचे मानकरी?

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने नमन पुरस्कार २०२६ च्या विजेत्यांची घोषणा केली आहे. हा समारंभ १५ मार्चला दिल्लीत होणार आहे. दिल्लीमध्ये या वार्षिक सोहळ्याचं आयोजन केलं जाणार आहे. या कार्यक्रमात २०२४-२५ हंगामातील आंतरराष्ट्रीय, देशांतर्गत आणि वयोगट क्रिकेटमधील खेळाडूंच्या उत्कृष्ट कामगिरीचा आणि योगदानाचा गौरव केला जाणार आहे.**



यासह बीसीसीआय ३ दिग्गज खेळाडूंना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करणार आहे.

बीसीसीआय हा पुरस्कार दरवर्षी विविध श्रेणींमध्ये सक्रिय खेळाडू, माजी खेळाडू, प्रशिक्षक आणि पंचांना प्रदान करते. बीसीसीआयने यावर्षी कोणत्या खेळाडूंना कोणते पुरस्कार मिळाले आहेत याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे यंदाच्या पुरस्कारांमध्ये दिग्गज रोहित शर्मा, विराट कोहली यांच्या नावाचा उल्लेख नाहीये.

बीसीसीआयने जाहीर केलं आहे की भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार शुबमन गिलला पॉली उम्रीगर पुरस्काराने सन्मानित केलं जाईल, जो पुरुष क्रिकेटमधील सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू पुरस्कार आहे. शुबमन गिलला सलग दुसऱ्यांदा हा पुरस्कार मिळणार आहे. स्मृती मानधनाला महिला गटात सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूचा पुरस्कार मिळेल. स्मृतीला हा पुरस्कार मिळण्याची ही पाचवी वेळ असेल.

या वर्षीच्या नमन पुरस्कारांमध्ये, रॉजर बिन्नी आणि राहुल द्रविड यांना भारतीय क्रिकेटमध्ये उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल बीसीसीआयकडून दिला जाणारा सर्वोच्च सन्मान कर्नल सी.के. नायडू जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केलं जाईल. महिला गटात, मिताली राजला बीसीसीआय जीवनगौरव महिला पुरस्काराने सन्मानित केलं जाईल. भारतातील महिला क्रिकेटच्या विकासात आणि जागतिक स्तरावर तिच्या अपवादात्मक योगदानासाठी हा पुरस्कार दिला जाईल.

भारताला १९ वर्षांखालील विश्वचषक २०२६ जिंकून देणारा आयुष म्हात्रे यांना पुरस्कार सोहळ्यात सर्वोत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी लाला अमरनाथ पुरस्काराने सन्मानित केलं जाईल. भारतीय महिला सलामीवीर फलंदाज शफाली वर्मा हिला २०२४-२५ हंगामासाठी सर्वोत्कृष्ट महिला क्रिकेटपटू (वरिष्ठ देशांतर्गत एकदिवसीय) जगमोहन दालमिया ट्रॉफीने सन्मानित केलं जाईल. महिला एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणारी दीप्ती शर्मा तसेच महिला एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा काढणारी खेळाडू म्हणून स्मृती मानधनाचे नाव समोर आले आहे.

# CSK च्या चाहत्यांना धक्का! धोनीची ही शेवटची IPL असणार

**महाईन्यूज । हैदराबाद**

**इंडियन प्रीमियर लीगच्या २०२६ हंगामाकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले असतानाच, महेंद्रसिंग धोनीच्या भवितव्याबाबत चर्चा सुरू झाली आहे. माजी भारतीय क्रिकेटपटू इरफान पठाणच्या मते, आयपीएल २०२६ हा धोनीचा शेवटचा हंगाम ठरू शकतो. त्यामुळे CHENNAI SUPER KINGS चाहत्यांसाठी हा हंगाम भावनिक असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**



जिओहॉटस्टारवरील चर्चेदरम्यान पठाण म्हणाला की, सीएसके आणि आयपीएल या दोन्हींसाठी धोनी अत्यंत महत्त्वाचा खेळाडू आहे. त्याच्या मते, “धोनीशिवाय सीएसकेची कल्पना करणे कठीण आहे. कदाचित धोनीचा हा शेवटचा हंगाम असेल.”

इरफानने असेही म्हटले की, धोनी मैदानावर किती सामने खेळणार हे स्पष्ट नसले तरी संघासाठी त्याची उपस्थिती अत्यंत महत्त्वाची असेल. विशेषतः ड्रेसिंग रूममध्ये त्याच्या अनुभवाचा आणि नेतृत्वाचा फायदा तरुण खेळाडूंना होणार असल्याचे त्याने सांगितले.

सीएसकेच्या संघात नव्याने आलेल्या संजू सॅमसन बाबत बोलताना पठाण म्हणाला की, सॅमसनलाही या संघातून नेतृत्वाचे धडे मिळतील. सध्या ऋतुराज गायकवाड हा संघाचा कर्णधार असला तरी भविष्यासाठी दोन-तीन खेळाडूंना नेतृत्वासाठी तयार केले जात आहे. या प्रक्रियेत धोनीची भूमिका महत्त्वाची असणार आहे.

दरम्यान, सीएसकेसाठी आणखी एक मोठा बदल म्हणजे यावेळी अनुभवी ऑलराउंडर रवींद्र जडेजा संघात नसणार आहे. तो आता RAJASTHAN ROYALS कडून खेळणार आहे. पठाणच्या मते, उत्तर प्रदेशचा तरुण ऑलराउंडर प्रशांत वीर हा जडेजाच्या जागी संघात प्रभावी कामगिरी करू शकतो.

इरफानने जडेजाच्या कारकिर्दीचे उदाहरण देत सांगितलं की, सुरुवातीला तोही तरुण खेळाडू होता. शेन वॉर्न यांनी राजस्थान रॉयल्समध्ये असताना त्याला तयार केले आणि तो पुढे जाऊन मोठा खेळाडू बनला. त्याचप्रमाणे तरुण खेळाडूंनाही सीएसकेमध्ये संधी मिळाल्यास ते मोठे खेळाडू बनू शकतात.

त्याने सांगितले की, सीएसके संघ व्यवस्थापन तरुण खेळाडूंना खूप आत्मविश्वासाने तयार करत आहे. स्टीफन फ्लेमिंग प्रशिक्षक आणि अनुभवी खेळाडूंचे मार्गदर्शन यामुळे संघात सकारात्मक वातावरण तयार होत आहे. आता आयपीएल २०२६ हंगामात सीएसकेचा मुख्य उद्देश सहावे विजेतेपद जिंकण्याचा असेल. जर संघाने हा किताब जिंकला, तर धोनीसाठी तो एक संस्मरणीय निरोप ठरू शकतो. त्यामुळे या हंगामाकडे चाहत्यांसह क्रिकेटविश्वाचेही विशेष लक्ष लागले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 15 मार्च 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# ८०० कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल

## अभय योजनेचा लाभ घेण्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे आवाहन

**महाईन्यूज । पिंपरी चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात दि. १ एप्रिल २०२५ ते १४ मार्च २०२६ या कालावधीत तब्बल ८०० कोटी ८४ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद, कर संकलन विभागाचे नियोजनबद्ध कामकाज, विविध सवलतींची अंमलबजावणी तसेच कर भरण्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन व ऑफलाइन सुविधांमुळे कर संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे.**

कर भरण्यास चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल महापौर रवि लांडगे यांनी सर्व करदात्यांचे आभार मानले आहेत. तसेच ज्या थकबाकीदारांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी अभय योजनेचा लाभ घेऊन लवकरात लवकर मालमत्ता कर भरावा, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

थकबाकीदार नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेमार्फत अभय योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत थकीत मालमत्ता कराची रक्कम एकरकमी भरल्यास दि. १ मार्च २०२६ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत विलंब दंडाच्या रकमेवर तब्बल ९० टक्के सवलत देण्यात येत आहे. अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी अवघे १७ दिवस शिल्लक राहिले आहेत. महापालिकेमार्फत नागरिकांना




या योजनेची माहिती देण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

पिंपरी चिंचवड शहरात सध्या निवासी- बिगरनिवासी, औद्योगिक व इतर एकूण ७ लाख ३२ हजार मालमत्तांची नोंद असून त्यापैकी ५ लाख ७५ हजार ३२८ मालमत्ताधारकांनी आतापर्यंत मालमत्ता कराचा भरणा केला आहे. कर भरणाऱ्या नागरिकांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे दिसून येत असून शहरातील नागरिकांकडून कर भरण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही, अशा थकबाकीदारांवर कर संकलन विभागामार्फत नियमानुसार जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

### वाकड विभागीय कार्यालयांतर्गत सर्वात जास्त वसुली..

कर आकारणी व कर संकलन विभागाची १ एप्रिल २०२५ पासून ते १३ मार्च २०२६ या कालावधीत वाकड विभागीय कार्यालयांतर्गत सर्वात जास्त वसुली झाली आहे. या कालावधीत या कार्यालयाने १०१ कोटी २१ लाख रुपयांची वसुली केली आहे. तर थेरगाव ८० कोटी ५६ लाख, चिखली कार्यालयाने ६६ कोटी ५४ लाख, किवळे ५५ कोटी ४६ लाख, कस्पटे वस्ती ५२ कोटी ३७ लाख, भोसरी ५१ कोटी ८५ लाख, चिंचवड ५० कोटी ७४ लाख, मोशी ५० कोटी ३४ लाख, पिंपरी वाघेरे ४५ कोटी ६४ लाख, सांगवी ४० कोटी १५ लाख, मनपा भवन ३७ कोटी ११ लाख, आकुर्डी ३६ कोटी ९ लाख, चऱ्होली ३१ कोटी ६१ लाख, फुगेवाडी दापोडी ३० कोटी ८३ लाख, दिघी बोपखेल २४ कोटी ९ लाख, तळवडे २१ कोटी ९ लाख, निगडी प्राधिकरण १७ कोटी ९९ लाख, पिंपरी नगर ७ कोटी १७ लाख.

“ पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी मालमत्ता कर वेळेत भरून महापालिकेच्या विकासकामांना मोठा हातभार लावला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद आणि कर संकलन विभागाचे नियोजनबद्ध कामकाज यामुळे ८०० कोटींहून अधिक कर संकलन शक्य झाले आहे. थकबाकीदार मालमत्ताधारकांनीही अभय योजनेचा लाभ घेऊन थकीत कराची रक्कम भरावी आणि शहराच्या विकासात सहभागी व्हावे.

– रवि लांडगे, महापौर.

“ महापालिकेमार्फत नागरिकांना कर भरण्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच अभय योजनेअंतर्गत विलंब दंडावर ९० टक्के सवलत दिल्यामुळे नागरिकांचा प्रतिसाद वाढत आहे. ज्यांनी अद्याप मालमत्ता कर भरलेला नाही त्यांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, अन्यथा नियमानुसार जप्ती व नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई करण्यात येईल.

– सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

# ग्रीन कॉरिडॉरमुळे दात्याचे फुफ्फुस वेळेत डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये; ५०वे हृदय-फुफ्फुस प्रत्यारोपण यशस्वी

## ग्रीन कॉरिडॉरमध्ये डॉक्टर, पोलिस आणि प्रशासनाची उत्कृष्ट कामगिरी

**महाईन्यूज** । पुणे

**उत्कृष्ट समन्वय, तत्परता आणि मानवतेचा सुंदर संदेश देत डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, पिंपरी, पुणे आणि महाराष्ट्र पोलिस विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ठाण्यातील किम्स हॉस्पिटलमधून दात्याचे फुफ्फुस पुण्यातील डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये ग्रीन कॉरिडॉरद्वारे सुरक्षितपणे आणि वेळेत पोहोचवण्यात आले. एखाद्या रुग्णाला नवजीवन देणाऱ्या या अमूल्य अवयवाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी ही वाहतूक निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात आली असून त्यामुळे रुग्णालयातील ५०वे हृदय-फुफ्फुस प्रत्यारोपण शक्य झाले आहे.**

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे चे कुलपती मा. डॉ. पी. डी. पाटील म्हणाले, "अशा जटिल अवयव प्रत्यारोपण आणि प्रगत शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आमचे रुग्णालय आघाडीवर आहे, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. आमच्या डॉक्टरांच्या उत्कृष्ट टीमने दाखवलेले समर्पण आणि उल्लेखनीय प्रयत्नांबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सुविधा आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिकाधिक जीव वाचवणाऱ्या प्रक्रिया राबवण्याचा आमचा निर्धार कायम आहे."

DPU
AYURVED HOSPITAL
Dr. D. Y. Patil Ayurved Hospital, and Research Centre
Pimpri, Pune

तसेच डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे चे प्र-कुलपती मा. डॉ. भाग्यश्री पी. पाटील, म्हणाल्या, "अवयवदानाबाबत समाजात अधिक जागरूकता निर्माण व्हावी आणि त्यातून अनेकांचे जीव वाचू शकतात हा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा, ही माझी नेहमीच भूमिका आणि दृष्टी राहिली आहे. आमच्या डॉक्टरांच्या टीमने त्यांच्या अथक परिश्रम, कठोर मेहनत आणि रुग्णसेवेप्रती असलेल्या निष्ठेमुळे हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याचा मला मनापासून अभिमान आहे आणि येत्या काळातही अशाच प्रकारे अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची आम्हाला आशा आहे."

१२ मार्च रोजी काटेकोर नियोजन आणि अचूक समन्वयातून दात्याच्या फुफ्फुसांची सुरक्षित वाहतूक करण्यात आली. किम्स हॉस्पिटल, ठाणे येथून डॉक्टर आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांची टीम सकाळी १०.१५ वाजता निघाली आणि अवघ्या दोन तास २५ मिनिटांत म्हणजेच दुपारी १२.४० वाजता ही फुफ्फुसे डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये पोहोचली. वेळेशी सुरू असलेल्या या शर्यतीत मिळालेल्या यशामुळे अत्यंत गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णावर जीव वाचवणारे फुफ्फुस प्रत्यारोपण करणे शक्य झाले असून त्याला नव्या आयुष्याची आशादायी संधी मिळाली आहे.

पिंपरी-चिंचवडचे प्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप चव्हाण, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव, ठाण्याच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रोहित कटकर यांच्या मार्गदर्शनाखाली महत्त्वपूर्ण अवयवाच्या जलद वाहतुकीसाठी ग्रीन कॉरिडॉर यशस्वीपणे तयार करण्यात आले.

ठाणे आणि पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच पिंपरी-चिंचवड पोलिस विभाग यांच्या समन्वयातून हा अवयव नियोजित वेळेत पुण्यात पोहोचवण्यात आला. त्यामुळे अत्यावश्यक प्रत्यारोपण प्रक्रिया पार पडून एका रुग्णाला नवजीवन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

या संपूर्ण मोहिमेत सहभागी पोलिस कर्मचारी, वैद्यकीय पथक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट समन्वय आणि तत्परता दाखवत दात्याच्या फुफ्फुसांची सुरक्षित व वेळेत वाहतूक सुनिश्चित केली. डीपीयू सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या समर्पित टीमने ग्रीन कॉरिडॉर आणि अवयव समन्वयाची जबाबदारी सांभाळली. या टीममध्ये डॉ. आशिष डोळस, डॉ. राहुल केंद्रे, वाल्मिक (ओटी नर्स), निखिल लाकी (परफ्युजनिस्ट), अरुण (ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर) आणि विशाल पाटील (तंत्रज्ञ) यांचा समावेश होता. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही जीवन वाचवणारी आणि आशेचा किरण देणारी मोहीम यशस्वी ठरली.

# एमआयटी आळंदीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता-मशीन लर्निंग कार्यशाळा संपन्न

**महाईन्यूज** । पिंपरी चिंचवड

**एम.आय.टी. आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, आळंदी येथे दिनांक १३ व १४ मार्च २०२६ रोजी "कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग" या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा महाविद्यालयाच्या स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड ॲप्लिकेशन्स तसेच सायन्स व कॉम्प्युटर सायन्स विभागाच्या वतीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली होती.**




कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. वाफारे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगचे वाढते महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी व संशोधकांनी या क्षेत्रात संशोधन व नवकल्पनांना प्राधान्य देऊन नवीन संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. या प्रसंगी डेप्युटी डायरेक्टर डॉ. अक्षदा कुलकर्णी, डॉ. मानसी अतितकर तसेच डीन रश्मी लाड उपस्थित होते.

या कार्यशाळेत देशभरातील विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविण्यात आला. सर्व सत्रे ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे प्रत्यक्ष उपस्थित तसेच ऑनलाइन सहभागी होणाऱ्या सर्वांना या कार्यशाळेचा लाभ घेता आला.

कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी श्री. प्रवीण कुमार (जेपी मॉर्गन चेस), श्री. रवी पुरस्वानी (थिसेनक्रुप मटेरियल्स) आणि श्री. कुणाल पगारिया (अमडॉक्स इंडिया प्रा. लि.) यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगच्या मूलभूत संकल्पना, त्याचे प्रकार तसेच आयटी उद्योगातील विविध उपयोग यावर सविस्तर मार्गदर्शन केले.


दुसऱ्या दिवशी श्री. सूर्यकांत लोखंडे (ई-झेस्ट डिजिटल सोल्युशन्स), श्री. सचिन काटकर (निटोर इन्फोटेक प्रा. लि.) आणि श्री. सार्थक नर्नोर (एज्युनेट फाउंडेशन) यांनी जनरेटिव्ह AI, कॉम्प्युटर व्हिजन, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग आणि एजेंटिक AI यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले. सहभागी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष डेटासेटवर काम करण्याची संधी देखील देण्यात आली.

या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, संशोधनाच्या संधी आणि उद्योग क्षेत्रातील उपयोग याबाबत सखोल माहिती मिळाली. तसेच संशोधन व नवकल्पनांसाठी नवी दिशा मिळाल्याचे सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.

या कार्यशाळेचे संयोजन डॉ. संगीता महेश बोर्डे (विभागप्रमुख, सायन्स व कॉम्प्युटर सायन्स) यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुनील पंडित महाजन, प्रा. जीवन प्रल्हाद तोंडे, प्रा. मयुरी मनोज बापट, डॉ. शितल वैभव घोटेकर, प्रा. अनुपमा वर्धमान अलगनवार, डॉ. अविनाश गोधरम चौरे, प्रा. कविता प्रशांत शिंदे, प्रा. मनिषा मिलिंद पाटील, डॉ. सुनयना कुंदन शिवथरे, डॉ. शर्मिला शरद मोरे, डॉ. सचिन साहेबराव झेंडे, प्रा. पल्लवी विलास घोलप, डॉ. भालचंद्र पवार, प्रा. शुभांगी विजय गायकर, डॉ. वंदना निलेश पगार, प्रा. पल्लवी सौरभ महागावकर, प्रा. रणवीर आनंद घाटे, डॉ. संदीप महादेव ढवळे, प्रा. वैभव सोपान गलबले, डॉ. शुभांगी संजीव भंगाळे तसेच समितीतील प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### कार्यशाळेत चर्चिलेले प्रमुख विषय

- कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगच्या मूलभूत संकल्पना
- आयटी उद्योगातील AI चे विविध उपयोग
- व्हाइब कोडिंगसह जनरेटिव्ह AI वरील प्रात्यक्षिक सत्र
- कॉम्प्युटर व्हिजन व नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंगवरील प्रात्यक्षिक सत्र
- एजेंटिक (स्वायत्त कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली)
- सायबर सुरक्षा क्षेत्रातील AI : प्रतिक्रियात्मक संरक्षणापासून पूर्वानुमानाधारित संरक्षणापर्यंत


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046